सकाळ IDOLS of महाराष्ट्र 2022

SON'S OF SOIL

# कंन्स्ट्रक्शन्स मध्ये गुणवत्तेची हमी देणाऱ्या गायत्री ग्रुपचे संस्थापक ओंकार घाटे



**ओंकार घाटे**

**नव्या काळात करिअर कोणत्या क्षेत्रात करायचं, यासाठी अनेक तज्ज्ञांचा सल्ला घेतला जातो. आणि त्या तज्ज्ञांच्या सल्ल्यातून विशिष्ट अभ्यासक्रमाची निवड केली जाते. पण ओंकार घाटे यांचे कुटुंब मोलमजुरीतून उदरनिर्वाह भागविणारं. त्यामुळे तज्ज्ञांचा सल्ला नाही, स्वतःची आवड - निवड सोडाच, काबाडकष्टातून दहावी शिकलेलं पोरगं. कागलातील त्या मास्तरांनी सांगितलं बिल्डिंग मेंटनन्स या ट्रेडला एकच जागा शिल्लक आहे, पाहिजे असेल तर अँडमिशन घे, नसेल तर राहूदे तेंव्हा आपली आवड - निवड, तज्ज्ञांचा सल्ला, भविष्यातील गुंतवणुक असे सगळे प्रश्न बाजूला सोडले आणि अवघ्या काही मिनिटांत त्यांनी फॉर्म भरला आणि किमान कौशल्याधारित अभ्यासक्रमाचा (एमसीव्हीसी) बिल्डींग मेटेंनन्स हा अभ्यासक्रम निवडला. केवळ अँडमिशन मिळाले म्हणून कोर्स केला. पुढे काम मिळाले, कामातून अनुभव मिळाला आणि आज एक - दोन नव्हे तर पाच कंपन्या उभ्या करून त्याचा कारभार सांभाळण्या इतपत क्षमता निर्माण झाली.**

स्वतः स्थिरस्थावर झालेच शिवाय इतरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात ओंकार घाटे यशस्वी झाले आहेत. अवघ्या दशकभरात त्यांचा हा प्रवास अनेकांना प्रेरणादायी ठरणारा आहे. मेट्रो सिटीजमध्ये गुणवत्तापुर्ण काम करणारी कंपनी म्हणून त्यांनी गायत्री कंस्ट्रक्शनला नावारूपाला आणले आहे.

**ओंकार घाटे मुळचे कागल तालुक्यातील सुळकुडचे.** दहावीनंतर पुढे काय, असे मार्गदर्शन फारसं मिळत नव्हतं. अभ्यासक्रम कोणता निवडावा यासंदर्भात काही पर्याय डोक्यात होते. पण आपली आवड आणि शैक्षणिक शुल्क, भविष्यातील करिअर अशा अनेक बोजड प्रश्नांनी डोक्यात विचारांच काहूर माजलं. अस काहूर घेऊनच ते शाहू टेक्निकल मध्ये पोचले. पुढे शिकायचं आहे जे मिळेल ते शिकू, एवढंच डोक्यात होत. एम. एम. पाटील सर भेटले आणि त्यांनी बिल्डींग मेटेंनेन्स ट्रेडसाठी एकच जागा शिल्लक आहेत त्याला अँडमिशन घे आणि रिकामा हो, असा सल्ला दिला. फीही त्यांनीच भरली. थोडासा विचार केला आणि डोक्यात आलं. कोणतही शिक्षण वाया जात नाही. जिद्दीने शिकायचं. शिक्षण घेतले की करिअर करणे सोपे जाते. आपलंही तेच होईल. अँडमिशन मिळालं शिक्षण सुरू झालं पहिल्यांदा फारस काही कळलं नाही. एकेक चॅप्टर समजुन घेत गेले. आणि आयुष्यात कधीही बिल्डींग कंस्ट्रक्शनचे शास्त्र ऐकलंही नव्हत पण या शिक्षणाने मात्र या विषयाची बऱ्यापैकी ओळख त्यांना करून दिली. घेतलेले शिक्षण वाया घालवू द्यायचं नाही आणि इतर शिक्षण घेण्याइतका वेळही नाही. कारण पोटापाण्यांची भ्रांत होती. यथावकाश कोर्स पुर्ण झाला. मेरिटमध्ये त्यांनी पहिला क्रमांक पटकावला आणि मनोनिग्रह करून जर अभ्यास केला तर तुम्हाला उत्तुंग यश मिळू शकते, याची जाणीव झाली.

कागल पंचतारांकित एमआयडीसी मध्ये नोकरीही थोड्याफार प्रयत्नाने मिळाली. बिल्डरकडे जॉब करण्यास सुरू केला. अभ्यासक्रमात शिकलेली थेअरी आणि नोकरीत प्रत्यक्ष प्रक्टीकल याचा समन्वय साधला आणि किमान कौशल्य हे अनुभवाच्या आधारे कमाल कौशल्य आत्मसात करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली. नोकरीत नवनवीन संधी चालून आल्या. कोल्हापूर सोडून, पुण्यात गेले. पुण्यातून थेट दिल्ली गाठली. तीन नोकऱ्या केल्या. तिन्ही नोकरीतून भरभरून अनुभव मिळाला. मापे टाकण्यापासून ते इमारतीच्या भक्कम उभारणीपर्यंतचे अनेक पैलू भक्कमपणे मनात, मेंदूत साठत गेले. तसे ते अनुभवी म्हणून अधिक आत्मविश्वासाने वावरू लागले. मोलमजुरी, महिन्याला ठराविक मिळणारा पगार यातून स्वतः च काहीतरी करण्याची इच्छा जागृत झाली. डोक्यातील प्रयोगशिलता कायम ठेवत छोटी मोठी कंस्ट्रक्शनची कामे घेण्यास सुरवात केली. स्वतःच्या क्षमता ओळखून व्याप वाढवत गेले.

वॉटर प्रुफींगचे कौशल्य आत्मसात केले आणि दोन तीन कामे मिळवली. एकट्याच्या कौशल्याला, अनुभवाला नेहमीच मर्यादा असतात म्हणून अजून दोन चार सहकारी हाताखाली कामाला घेतले. कामे वाढत गेली. व्यावसायिक व्याप वाढत गेला. तसेच मनुष्यबळही वाढत गेले. गायत्री कंस्ट्रक्शन नावाची स्वतःची फर्म सुरू केली. सध्या जवळपास ४० इंजिनिअर्स आणि एक हजार पाचशे कुटुंबियांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर. कष्ट, चिकाटी, जिध्द, प्रामाणिकपणा हे त्यांचे यशाचे रहस्य आहे. दरम्यान, त्यांनी रायपूर येथील कलिंगा विद्यापीठातून इंजिनिअरींगमधील पदवीही संपादन केली. खोपीत राहणारा मुलगा, करिअर कोणत्या क्षेत्रात करायचं, याविषयी कन्फ्युज असणारा विद्यार्थी आणि जिद्दीने अभ्यास करून प्रथम श्रेणीत आलेला गुणवंत उमेदवार इथपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास पाच कंपन्याचा मालक इथपर्यंत येऊन ठेपला आहे.





## ओंकार घाटे यांचा व्याप

- गायत्री कंस्ट्रक्शन्स
- घाटे कंन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
- घाटे वॉटर प्रुफींग सोल्युशन्स प्रा. लि.
- प्रिमियम कंस्टो केमिकल्स
- ओंकार ट्रेडर्स

घाटे यांच्या पुणे, दिल्ली, बेंगलोर, हैद्राबाद, मुंबई, गुजरात, कोल्हापूर सह मेट्रो सिटीजमध्ये ४३ पेक्षा जास्त साईट सुरू आहेत. कोणतेही काम करताना ते चांगल्या दर्जाचे होण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. त्यासोबतच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी सेफ्टीवर अधिक भर दिला आहे. डे - नाईट शिफ्टमध्ये काम करताना त्यांनी कर्मचाऱ्यांना सर्वोच्च सुरक्षा प्रदान केली आहे. शिवाय कामाचे उच्च दर्जाचे प्रशिक्षणही ते कर्मचाऱ्यांना देतात.